**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांक भांखस/डस्टर/दर निश्चिती/(३२)/**

**२००७-२००८/बी-२९०४९, दिनांकः- २०/१०/२००७.**

**वाचा :-**

1. **शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दि. ०२/०१/१९९२.**
2. **शासन निर्णय क्र. भांखस-१०९४/(२७०२)/४०६५३/उद्योग-६, दिनांक२०/०५/१९९५.**
3. **उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.भाखसं-१०९५/२७२८/उद्योग-६, दिनांक १९/०६/१९९६.**
4. **मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती निर्णय क्र. १४, बैठक दिनांक ०८/१०/२००७.**

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस/१०८८/२५१२/उ-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ च्या परिशिष्ट- पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-१०९४/(२७०२)/४०६५३/उद्योग-६, दि. २०/०५/१९९५ अन्वये **मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई-४०० ००१ व मे. मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीज होम फॉर दि ब्लाईड, जोगेश्वरी, मुंबई** यांना ''**डस्टर**'' या बाबीचे आरक्षण देण्यांत आले आहे.

**भांडार खरेदी समिती निर्णय :-** मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने त्यांच्या दिनांक ०८/१०/२००७ रोजी झालेल्या बैठकीत खालील प्रमाणे दरनिश्चिती केली आहे.

''**डस्टर**'' ही बाब मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई-४०० ००१ व मे. मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीज होम फॉर दि ब्लाईड, जोगेश्वरी, मुंबई यांचेकरिता राखीव असल्याने त्यांचेकडून खरेदी करण्यांत यावी.

**शासनाचे अंगीकृत महामंडळ/मंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व मंडळांची/महामंडळानी स्वतःच उत्पादन केलेल्या वस्तूंचे शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व महामंडळांनी ''बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये.''**

**अंध व अपंग यांची धर्मादाय संस्था यांनी अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयांनी दिलेले काम पूर्ण करुन घ्यावे.**

**सन २००७-२००८ सालासाठी ''डस्टर'' चे निश्चित केलेले दर**

| | |
|---|---|
| **विनिर्देश** | **कॉटन डस्टर ७५ सें.मी x ७५ सें.मी**<br>**वजन १२० ग्रॅम प्रत्येकी नग** |
| **कच्चा माल** | **वार्प २/२० कॉटन (६० ग्रॅम) उभे धागे- ३६ प्रती इंच**<br>**वेप्ट ६ इंच (६५ ग्रॅम) आडवे धागे- २४ प्रती इंच**<br>**धागा ४ मी. (६० नंबर)**<br>**प्रति नग दर रुपये २८.८० फ्रि डिलीव्हरी मुंबई.**<br>**रुपये ३०.०० एफ.ओ.आर. डेस्टीनेशन** |

**वरील दर हें एफ.ओ.आर. डेस्टिनेशन सर्व कर समाविष्टीत असे राहतील. वरील दर हे दि.३०/०६/२००८ पर्यंत ग्राहय राहतील.**

**पुरवठा कालावधीः-** मागणीपत्र मिळाल्यापासून ६ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. **देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकाराला माल प्राप्त झाल्यानंतर **९०%** टक्के रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित **१०%** टक्के रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर **½ %** टक्के प्रती आठवडा प्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % दंड

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड

**(वि. वा. भामरे)**
**उद्योग उप संचालक ( भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

**उद्योग सह संचालक ( भां.ख.)**
**यांचे मान्यतेने.**

प्रति :-

१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

२) मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीयल होम फॉर दि ब्लाईड, (**Chateau DIAEU**), २८०, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई- ४०० १०२.